# प्रेसनोट दि.१३/०३/२०१९

## दत्तवाडी पोलीस स्टेशन आयोजित चित्रकला स्पर्धेचा बक्षीस समारंभ संपन्न*

पोलीस स्टेशन च्या वतीने महाराष्ट्र पोलीस रेजिंग डे निमित्तआयोजित केलेल्या शालेय विद्यार्थी चित्रकला स्पर्धेचा बक्षीस समारंभशिवछत्रपती पुरस्कार विजेते आंतरराष्ट्रीय जलतरण पट्टू कुमार श्वेजल शैलेशमानकर यांच्या हस्ते पार पडला.
ह्या प्रसंगी डॉक्टर मिलिंद भोई,उदय जगताप,नितीन करंदीकर,ज्योती ढमाळ, लक्ष्मण मोरे,बापू कुलकर्णी,संतोष बेंद्रे, सुनील भांडवलकर, भीमसेनमहागावकर,शैलेश मानकर हे उपस्थिती होते.

*श्वेजल मानकर*यांनी आपल्या मनोगत मध्ये सांगितले की ,मी तीन वर्षाचाअसताना माझ्या पालकांनी मला जलतरण ह्या क्रीडा प्रकारात उतरवुन स्पर्धेच्यावातावरणात धाडले.ज्या मुळे मी स्पर्धात्मक वातावरणाशी जुळवून घेण्यास तयारझालो.व वेगवेगळ्या स्पर्धेमध्ये उतरून अवघड असे गड सर करू लागलो तसेचतुम्ही सुद्धा लहान वयात स्पर्धात्मक वातावरणाशी जुळवून घ्या म्हणजे अवघडअसणारी गोष्ट सुद्धा तुम्हाला सोपी आणि साध्य होणारीवाटूलागेल.*उदय जगतापयांनी "भारत देश जर महान म्हणून जगा समोर आणायचा असेल तरत्याची सुरवात लहान मुलांपासून करायला हवी.कारण आजची पिढी ही बुद्धिवान आहेत्यांच्या बुद्धीच्या जीवावर आपण अनेक नवनवीन गोष्टी जगाच्या समोर आणूशकू ,मुलांनी मोबाईलच्या विश्वात न रमता चित्ररूपी संकल्पना मांडल्या आहेतत्या सत्यात उतरविण्याचा प्रयत्न करावा.दत्तवाडी पोलीस स्टेशन ने नवं नवीनसंकल्पना राबवून जनतेच्या प्रत्येक अडचणीना वेळेत प्रतिसाद देण्या करिताकम्युनिटी पोलिसिंग चा उत्तम पर्याय निवडला आहेव त्याला नागरिकांचासुद्धा चांगला प्रतिसाद मिळत आहे.कार्यक्रमाचे संयोजक वरिष्ठ पोलीस निरीक्षक *देविदास घेवारे* यांनी आपल्यामनोगता मध्ये "प्रत्येक नागरिकां पर्यंत पोलीस सेवा पोहचली पाहिजे व तीउत्तम आणि व्यवस्थित असावी असा माझा प्रयत्न असून त्या साठी पुणे शहर पोलीसआयुक्त डॉक्टर वेंकटेशम ह्याच्या संकल्पनेतील कम्युनिटी पोलिसिंग हेप्रभावी माध्यम आहे ज्या मधून समाजातील प्रत्येक स्तरा पर्यंत पोहचने सहजशक्यहोते. ह्या चित्रकला स्पर्धेत विविध शाळेतील एकूण ५६० विद्यार्थ्यानी सहभागनोंदविला होता.स्पर्धेत सहभागी झालेल्या प्रत्येक विद्यार्थ्यास प्रमाणपत्रदेण्यात आले.ह्या वेळेस विद्यार्थ्यांनी काढलेल्या चित्रांचे प्रदर्शनमांडण्यात आले होते पालकांनी मोठ्या प्रमाणात ह्या कार्यक्रमास उपस्थितीनोंदवली व आपल्या मुलांनी काढलेल्या चित्रांचे आवर्जून निरीक्षण केले.

निकालपुढीलप्रमाणे* इयत्ता ५वी ये ७वी*

१)अश्विनी बाळू स्वामी(हुजूरपागा प्राथमिक शाळा,कात्रज,)

२)दिशा अनिल वाघ(महावीर इंग्लिश मिडियम स्कुल,

३)तनिष्क भूषण कानडे(अरण्येश्वर इंग्लिश मिडियम स्कुल)

उत्तेजनार्थ:-

प्रतीका सतीश बनकर(सेंट अँन्स हायस्कुल)

अनन्या निलेश पंडित(केंद्रीय विद्यालय,लुल्लांगर)

सई प्रभाकर भोसले(मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कुल)

*इयत्ता ८वी ते ९वी*

१)आदित्य चंद्रकांत अकोलकर(स्प्रिंगडेल पब्लिक स्कुल)

२)श्वेता पठारे(अरण्येश्वर इंग्लिश मिडियम स्कुल)

३)ओंकार घुगे(मुक्तांगण इंग्लिश मिडियम स्कुल)

उत्तेजनार्थ:-

मल्हार धनंजय ढुमे(अरण्येश्वर इंग्लिश मिडियम स्कुल)

यश दिवे(अरण्येश्वर इंग्लिश मिडियम स्कुल)

नितीन म्हालिंग कुलाल(स्प्रिंगडेल इंग्लिश मिडियम स्कुल)

*इयत्ता १०वी ते १२ वी*

१)अनुज सुभाष गोरखे(हिरे हायस्कुल)

२)चंद्रकांत अनिल बनसोडे(रावसाहेब पटवर्धन महाविद्यालय)

३)ओंकार शरणाप्पा कलशेट्टी(समाजभूषण बाबुराव फुले माध्यमिक विद्यालय,)

*लहान गट विशेष पुरस्कार*

१)वेदिका मनोज तांबट(हुजूरपागा प्राथमिक शाळा लक्ष्मी रोड

२)सम्यक एन बोरा(बिशप्स स्कुल)

वरील स्पर्धा यशस्वी करण्यासाठी पोलीस निरीक्षक(गुन्हे) राजेंद्र सहाणे, सहायक पोलीस निरीक्षक शंकर सलगर ,पोलीस उपनिरीक्षक मंगेश साळवे ,विकासजाधव,राजू पवार ,श्रीकांत शिरोळे,साधना ताम्हाणे,श्रद्धा जायभाये,आदिनाथदेवकर,कुणाल माने,महेश गिरी,रोहन खैरे,पांडुरंग सुतार, निलेश बोडके,स्वप्नालिमगुडे, गीता परदेशीयांनी विशेष प्रयत्न केले.

**(देविदास घेवारे)**

वरिष्ठ पोलिस निरीक्षक,

दत्तवाडी पोलीस स्टेशन,पुणे